पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

दिनांक - **०२/११/२०१६** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०२/११/२०१६** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

या शिवाय मा.कडूसकर – सहाय्यक आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

सभाकामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने सभागृहात उपस्थित असलेल्या सन्मा.सदस्यांनी सदर सभा बुधवार दिनांक १६/११/२०१६ रोजी दुपारी १.४५ वाजेपर्यंत तहकूब केली.

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०२/११/२०१६ ची तहकुब सभा **)**

दिनांक - **१६/११/२०१६** वेळ - दुपारी **१.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक ०२/११/२०१६ ची तहकूब सभा बुधवार दिनांक **१६/११/२०१६** रोजी दुपारी **१.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.ओव्हाळ शेखर अशोक
३. मा.ननवरे जितेंद्र बाबा
४. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५. मा.तानाजी विठ्ठल खाडे
६. मा.विनोद जयवंत नढे
७. मा.विमलताई सुरेश जगताप

या शिवाय मा.कडूसकर – सहाय्यक आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.विमलताई जगताप अनुमोदक – मा.तानाजी खाडे

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दि.१६/११/२०१६ ची तहकूब सभा बुधवार दि.०७/१२/२०१६ रोजी दुपारी १.४५ वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** बुधवार दिनांक **०७/१२/२०१६** रोजी दुपारी **१.४५** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०२/११/२०१६ व १६/११/२०१६ ची तहकुब सभा **)**

दिनांक - **०७/१२/२०१६** वेळ - दुपारी **१.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक **१६/११/२०१६** ची तहकूब सभा बुधवार दिनांक **०७/१२/२०१६** रोजी दुपारी **१.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.ननवरे जितेंद्र बाबा
३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
४. मा.विमलताई सुरेश जगताप

या शिवाय मा.कडूसकर – सहाय्यक आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.दंडवते – सहा.आयुक्त, मा.कदम – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक – मा.तानाजी खाडे

तामिळनाडूच्या मुख्यमंत्री श्रीम.जयललिता यांचे निधन तसेच सुरक्षा विभागातील सुरक्षा रक्षक मल्लीक यांचे नुकतेच निधन झालेले आहे त्यांस आजचे सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

----------

दिनांक **१९/१०/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्र.२ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ०७ विषय क्रमांक - १

दिनांक - ०७/१२/२०१६ विभाग - क्रीडा

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/५२४/२०१६, दि.१६/०९/२०१६

विषय - महापौर चषक जिल्हास्तर बुद्धिबळ स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत...

मा.सदस्य प्रस्तावाद्वारे विषयांकित प्रस्तावास मा.स्थायी समिती सभेची मान्यता मिळालेली असल्याने विभाग प्रमुख यांचे विनंती नुसार सदरचा विषय विषयपत्रिकेवरुन मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०८ विषय क्रमांक - २

दिनांक - ०७/१२/२०१६ विभाग - क्रीडा

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.विमलताई जगताप

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/५३३/२०१६, दि.१६/०९/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जिल्हास्तर शालेय हॉकी स्पर्धा २०१६-१७ मधून म.न.पा.शाळेचे ४ संघ, विभागीय शालेय हॉकी स्पर्धा २०१६-१७ करिता पात्र झालेले असल्याने या विजयी खेळाडूंना विभाग व राज्यस्तर पातळीवर खेळण्यासाठी उत्कृष्ट चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण मिळण्यासाठी १० दिवसांचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.६,०००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०९ विषय क्रमांक - ३

दिनांक - ०७/१२/२०१६ विभाग - क्रीडा

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.विमलताई जगताप

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/८/कावि/१४७/२०१६, दि.०७/०९/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर र.रु.३३,००,०००/-एवढी तरतूद करण्यात आलेली असून त्यापैकी आज अखेर र.रु.६१,४४४/- खर्च झालेला असून र.रु.३२,३८,५५६/- एवढी तरतूद शिल्लक आहे. त्यापैकी र.रु.२,००,०००/- एवढी तरतूद अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षामधून मा.सभापती, क्रीडा समिती वाहन इंधन या लेखाशिर्षावर वर्ग करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक - ४

दिनांक - ०७/१२/२०१६ विभाग – सार्वजनिक वाचनालय

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.सावा/२/कावि/१९४/२०१६, दि.१७/१०/२०१६

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय विभागांतर्गत नव्याने सुरु करण्यात येणा-या भोसरी येथील स्पर्धा परीक्षा केंद्रातील **MPSC/UPSC** च्या विद्यार्थ्यांसाठी नविन पुस्तकांची खरेदी करणेकामी सार्वजनिक वाचनालयाकडील कोटेशन क्रमांक १ जावक क्र.सावा/१/कावि/११६/२०१६ दिनांक ०९/०८/२०१६ अन्वये प्रसिध्द करुन दरपत्रक मागविण्यात आले होते. सदर स्पर्धा परीक्षा केंद्राकरीता पुस्तक खरेदी करणेकामी पुरवठाधारकांकडून निविदा कोटेशन मागविले असता ३ पुरवठा धारकाकडून

निविदा भरल्या असून आदित्य डिस्ट्रीब्युशन यांनी २०%, चैताली प्रकाशन यांनी २२%, नर्मदा प्रकाशन यांनी २३% कमी दराने निविदा सादर केली आहे. नर्मदा प्रकाशन,पुणे यांनी नवीन पुस्तक खरेदीवर सर्वाधिक म्हणजे २३% सुट दिली आहे. त्यानुसार ' नर्मदा प्रकाशन पुणे ' यांचेकडून भोसरी येथे नव्याने सुरु करण्यात येणा-या स्पर्धा परिक्षा केंद्राकरीता एकूण ४०९ नवीन पुस्तके थेट पध्दतीने खरेदीकरणे कामी अंदाजे र.रु.७७,६४९/- इतका खरेदी खर्च अपेक्षित आहे. (अंदाजित रक्कम रु.१,००,८४३/- च्या २३% कमी दराने) नर्मदा प्रकाशन पुणे यांचेकडुन प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार भोसरी येथील अभ्यासिका व स्पर्धा परिक्षा केंद्रास पुस्तक खरेदीवर २३% सूट देवून र.रु.७७,६४९/- (अक्षरी र.रु.सत्याहत्तर हजार सहाशे एकोणपन्नास फक्त) ची स्पर्धा परिक्षांची पुस्तके खरेदी करणेस व सदरचा खर्च " पुस्तक नियतकालिके व लेखे " या लेखाशिर्षातुन अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६५१/२०१६
दिनांक : ०८/१२/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv.\New Folder\File 17 sub committee sabhapati.doc